





**तरुण भारत**

# पर्यावरणाचे संरक्षण प्रत्येक घटकाची जबाबदारी : सारोळकर

प्रतिनिधी

इस्लामपूर

पर्यावरण संरक्षण व संवर्धन ही संस्था तसेच समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे, असे मत पूजा सारोळकर यांनी प्रतिपादन केले.

म. फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये हरित/पर्यावरण/इलेक्ट्रॉनिक समिती द्वारा वैयक्तिक भागधारकांद्वारे संस्थात्मक पर्यावरण उपक्रमांवर प्राध्यापक विकास कार्यक्रमअंतर्गत आयोजित एक दिवशीय कार्यशाळेत प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नितीन शिंदे होते.

सारोळकर पुढे म्हणाल्या, पर्यावरण संरक्षणासाठी ऊर्जा संवर्धन, अक्षय ऊर्जा वापर, कार्बन न्यूट्रॅलिटी, कार्बन सिक्वेस्टेशन, वृक्षारोपण, भूजल पुनर्भरण, घातक व ई–कचरा नियोजन, हवा, पाणी यांची गुणवत्ता, कार्बन क्रेडिट, हवेचे गुणवत्ता मोजणारे ॲप, सांडपाणी प्रक्रिया प्लांट, कचऱ्याच्या प्रकारानुसार वेगवेगळ्या कचराकुंड यांचा वापर व त्यांचा फायदा, पर्यावरण जागरूकता कमिटी पर्यावरण संरक्षण कॅलेंडर, ५– इ. उपक्रम संस्था तसेच प्रत्येक व्यक्ती छोट्या–छोट्या उपक्रमातून राबवू शकतो.

नारळाच्या करवटीमध्ये वृक्षारोपण करणे, टाकाऊ नैसर्गिक वस्तूपासून चांगल्या टिकाऊ वस्तू बनवणे, त्याच्यामध्ये सॅन्ड फिल्टर, वेस्ट पेपर वापरून कुंड्या बनवणे, रंगपंचमीसाठी नैसर्गिक कलर, नैसर्गिक पदार्थ व वृक्षांच्या बिया वापरून तयार केलेल्या गणेश मूर्ती, पानाफुलांचा वापर करून सुशोभीकरण करणे, इको फ्रेंडली राखी तसेच सीड बॉल इत्यादी छोट्या छोट्या उपक्रमाच्या माध्यमातून संस्था तसेच समाजातील प्रत्येक व्यक्ती आपले पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी योगदान देऊ शकतो.

यावेळी प्राचार्य डॉ.नितीन शिंदे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये राबवले जाणारे पर्यावरण संरक्षण व संवर्धन उपक्रमांची माहिती दिली. स्वागत व प्रास्ताविक ग्रीन ऑडिट कमिटी प्रमुख डॉ.संदीप ए.पाटील यांनी केले. साधन व्यक्तींची ओळख प्रा.डॉ.महेश गोखले, सूत्रसंचालन प्रा.अनिल माळी यांनी केले. आभार प्रा.नांगरे यांनी मानले. यावेळी कॉलेजमधील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

इस्लामपूर : कर्मवीर महाविद्यालयात कार्यशाळेचे उद्घाटन करताना पूजा सारोळकर, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य पी. व्ही. गायकवाड आदी.

सांगली | ■ गुरुवार, दि. १३ मार्च २०२५